**नि.क्र.१२**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०३ याची साक्ष</u> –**

**मी याद्वारे असे शपथेवर निवेदन करतो की :**

माझे नांव : जॉन फ्रान्सीस फर्नांडीस

वय सुमारे : ५४ वर्षे, धंदा –मजुरी

राहणार : गणेश नगर, रानबांबुळी, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग

**<u>अभियोग पक्षातर्फे सरतपास सहा.सरकारी वकील श्री.जी.आर.माजगावकर यांचे मार्फत</u>**

**०१.** दिनांक ०१ जून २०२५ मध्ये माझी मुलगी सेलिना ही माझे मुलासोबत चारचाकीने कुडाळ येथे संध्याकाळी ७.४० च्या दरम्यान घरातून निघाली. त्यानंतर वाटेत त्यांना आज कोर्टात हजर असलेला आरोपी जोसेफ फर्नांडीस भेटला. त्याने माझे मुलीला गाडीतून उतरविले व स्वत:च्या दुचाकीवर घेतले व म्हणाला की, आपण कुडाळला जावून शॉपिंग करुन येऊ. हुमरमळा येथील आयशर शोरुम समोर ते दोघे गाडीवरुन पडले. त्यानंतर माझा मुलगा जॉन्सन याने ८.३० च्या सुमारास मला फोन करुन सदर अपघाताबाबत सांगितले व माझे मुलीला सिव्हील हॉस्पीटल, सिंधुदुर्ग येथे आणले असल्याचे सांगितले. त्यानंतर मी व माझी पत्नी तीला पाहण्यासाठी निघालो. त्या दवाखान्यात तिच्यावर उपचार होण्यासारखे नसल्याने तिला गोवा बांबुळी हॉस्पीटल येथे नेण्याची तयारी सुरु होती. माझा मुलगा व माझे पत्नीचा मावस भाऊ फ्रान्सीस फर्नांडीस माझे मुलीसोबत ॲब्यूलन्सने गोवा बांबुळी हॉस्पीटलकडे गेले. मी व माझी पत्नी अपघाताच्या ठिकाण पहाणेसाठी गेलो. त्यावेळी तेथे पल्सर मोटार सायकल तसचे आरोपी जोसेफ व माझे मुलीच्या चपला पडलेल्या दिसल्या व रक्ताचे डाग देखील दिसले.

**०२.** दुस–या दिवशी सकाळी ८.०० च्या दरम्यान माझे पत्नीचा मावस भाऊ फ्रान्सीस याने माझे मुलीचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याचे सांगितले. सदरचा अपघात आरोपीच्या चुकीमुळे झालेला आहे. त्याने गाडी रस्त्याच्या परिस्थीतीकडे दुर्लक्ष करुन अतिवेगात चालविल्यामुळे अपघात घडला. माझे मुलीच्या मृत्यूस तोच जबाबदार आहे. आरोपी जोसेफ हा माझा दुरचा नातेवाईक आहे त्यामुळे मी त्याला ओळखतो. तो आज रोजी कोर्टात हजर आहे.

**सरतपास पूर्ण.**

<u>**आरोपी तर्फे उलटतपास सन्माननीय वकील श्री.पी. एम. मुजावर यांचे मार्फत**</u> –

**०३.** माझी मुलगी माझे मुलासोबत घरातून बाहेर पडली हे मी पाहीले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझी मुलगी आरोपीच्या गाडीवरुन बसून गेल्याचे मी प्रत्यक्ष पाहिलेले नाही.

प्रश्न– अपघाताच्या चौकशीसंदर्भात पोलीस तुमच्याकडे आले होते की तुम्ही पोलीस ठाण्यात गेला होता?

उत्तर–माझा मुलगा गेला होता, मी गेलो नव्हतो.

**०४.** हे म्हणणे खरे नाही की, अपघातासंदर्भात पोलीसांनी माझेकडे चौकशी केली नाही. साक्षीदार सांगतो की, अपघातानंतर तीन–चार दिवसांनी पोलीसांनी माझेकडे चौकशी केली. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी पोलीसांना मी सांगितले व पोलीसांनी लिहून घेतले असे घडले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझे मुलीला गाडीवर बसविले व शॉपिंग करायला जावूया असे म्हणाला असे मी पोलीसांना सांगितले नव्हते.

**०५.** हे म्हणणे खरे आहे की, मी सदरचा अपघात प्रत्यक्ष पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे अपघात प्रत्यक्षात कसा घडला हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा अपघात कोणाच्या चुकीमुळे झाला हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा अपघात आरोपीच्या चुकीमुळे झालेला आहे, त्याने गाडी रस्त्याच्या परिस्थीतीकडे दुर्लक्ष करुन अतिवेगात चालविल्यामुळे अपघात घडला व माझे मुलीच्या मृत्यूस तोच जबाबदार आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझे टिपण माझे समक्ष लिहिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी गाडी चालवित होता हे माझे म्हणणे खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी व चुकीची साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

<u>**फेरतपास**</u> – नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by AVADHUT GAJANAN DESHINGKAR
Date: 2026.03.07 18:14:52 +0530

ठिकाण :– ओरोस
दिनांक :– ०७/०३/२०२६.

**( ए.जी.देशिंगकर )**
अति.मुख्य न्यायदंडाधिकारी,
सिंधुदुर्ग–ओरोस.